— : प्रेस नोट :— दिनांक— ३०/०४/२०१९

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई
गुन्हा नोंद क्र. ३९/२०१३, कलम— ७, १३(१)(ड) सह १३(२) भ्र.प्र.अधिनियम १९८८
विशेष खटला क्र. ३१/२०१५

<u>आरोपी</u> — **उदयसिंग गोकुळसिंग चौहाण, कक्ष अधिकारी,** अर्बन डेव्हलमेंट डिपार्टमेंट, मंत्रालय, मुंबई यांनी लाच स्विकारण्याचे कबुल केल्या प्रकरणी दाखल गुन्हयात कारावास व दंडाची शिक्षा.

यातील वरील नमुद लोकसेवक अटक आरोपीने लोकसेवक पदाच्या नात्याने काम करतांना यातील फिर्यादी व त्यांच्या सहकाऱ्यांना निलंबनातुन मुक्त करण्यासाठी आणि त्यांना सेवेत पुर्नस्थापित करण्यासाठी रु. १,००,०००/— ची मागणी करुन चर्चेनंतर रुपये २५,०००/— कमी करुन तडजोड केली व उर्वरीत रक्कम स्विकारण्याचे कबूल केले म्हणून ला.प्र.वि., मुंबई विभागाकडुन गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदर गुन्हयाचा तपास पुर्ण करून मा. विशेष सत्र न्यायालयात उपरोक्त आरोपी विरूध्द विशेष खटला क्र. ३१/२०१५ अन्वये दोषारोप पत्र सादर करण्यात आले होते. सदर खटल्याची सुनावणी मा. विशेष सत्र न्यायालय, कोर्ट क्र. ४६ येथे झाली असता, सुनावणी अंती लोकसेवक आरोपी विरूध्द आरोप सबळ पुराव्यानिशी सिध्द झाल्याने दिनांक ३०/०४/२०१९ रोजी मा. न्यायालयाने नमुद आरोपीस खालील प्रमाणे शिक्षा सुनावली आहे.

**कलम — १२ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ अन्वये ३ वर्षे साधा कारावास व दंड रू. १,०००/— दंड न भरल्यास १ महिना साधी कैद.**

सदर गुन्हयाचा तपास तत्कालीन तपासी अधिकारी सहाय्यक पोलीस आयुक्त श्री. शहाजी शिंदे यांनी केला. सदर खटल्यात सरकारी अभियोक्ता श्री. सुनिल गोन्सालविस यांनी काम पाहिले.

**लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारा संबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवका बद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभागाकडे संपर्क साधावा.**

**<u>संपर्क</u>—लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,मुंबई विभाग, ९१,सर पोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई— ३०.**
**संकेतस्थळ — acbmaharashtra.gov.in**
**ईमेल : (1) acbwebmail@mahapolice.gov.in, (2) addlcpacbmumbai@mahapolice.gov.in**
**ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन - www.acbmaharashtra.net**
**टोल फ्री क्र. १०६४**
**दूरध्वनी क्र. ०२२—२४९२१२१२, फॅक्स क्र. ०२२—२४९२२६१८,**
**व्हॉट्स ॲप क्रमांक —९९३०९९७७००**

30.4.19
( दिनकर पिंगळे )
सहाय्यक पोलीस आयुक्त (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबधंक विभाग,
मुंबई विभाग.

Scanned by CamScanner